अंधाराचे डोळे

मल्हार अरणकल्ले

‘अंधाराचे डोळे’ या ललित लेखसंग्रहातील पानापानांत निसर्ग तर आहेच; पण त्याच्याच जोडीनं मनात उमललेली पानं आहेत, फुलं आहेत, पक्षी आहेत. अनुभवांचं निराळेपण आहे. मोठ्या माणसांत दडून बसलेलं अवखळ-चौकस ‘मूलपण’ही त्यात डोकावलेलं आहे. माझ्या छोट्या गावात जे अजब जग पाहिलं, त्याची शब्दचित्रं आहेत. शाळेत शिकलेल्या अक्षरांना-शब्दांना या जगानं अर्थ दिला, सौंदर्य दिलं. मग हेच शब्द, हीच चित्रं कागदांवर घरंगळत राहिली.

‘अंधाराचे डोळे’ पाहताना जागं झालेलं कुतूहल नवी दृष्टी देऊन गेलं. पाहू त्यात सुंदरताच दिसत राहिली.

लहान वयात मुलांनी टिपलेल्या या प्रतिमा कायमस्वरूपी असतात. त्या व्यक्त होण्याचे मार्ग नंतर बदलतात, इतकंच!

ललित लेखसंग्रह
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
किंमत ₹ ११०
jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

अंधाराचे डोळे

लेखक
मल्हार अरणकल्ले

छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411 030
www.chhatraprabodhan.org

❋ **अंधाराचे डोळे**

('छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठी प्रकाशित होत असलेल्या मासिकामध्ये २०२१ पर्यंत प्रकाशित झालेल्या लेखकाच्या ललित लेखांचा दुसरा संग्रह)

❋ **प्रकाशक व मुद्रक**

प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, 'छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
website - www.chhatraprabodhan.org

❋ **लेखक**

मल्हार अरणकल्ले
१०-२, गुरुजन सोसायटी, कोथरूड पोलिस स्टेशनजवळ,
कोथरूड, पुणे ४११०३८ (मोबाईल- ९८८१०९९००७)
email - arankalle.malhar@gmail.com

© स्वामित्व लेखकाच्या स्वाधीन

❋ **अक्षरजुळणी**

छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे 30

❋ **मुखपृष्ठ :** दीपक संकपाळ

आतील चित्रे : दीपक संकपाळ, गिरीश सहस्रबुद्धे, शिवाजी तुपे, दत्तात्रेय पाडेकर, अनंत कुलकर्णी, निलेश जाधव, मिलिंद मुळीक, पुंडलिक वझे, सचिन जोशी, चित्रांजली, मुकुंद भालेराव, तेजस्वी भुरके, ऋजुता घाटे, साहिल उपळेकर, सौरभ उपळेकर

❋ **शीर्षक लेखन –** बाबू उडुपी

❋ **वितरण**

छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **www.jpprakashane.org**

❋ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर श्रावण शके १९४४, ऑगस्ट २०२२

❋ **किंमत ₹ ११०**

'Andharache Dole'(Collection of Pre-published Stories from Chhatra Prabodhan Magazine for Youngsters' published by Jnana Prabodhini)

प्रस्तावना

हे सगळं आलं कुठून?

'छात्र प्रबोधन'मध्ये लिहू लागलो, त्याला पाहतापाहता पंचवीसएक वर्षं झाली, यावर विश्वास बसत नाही. दिवाळी अंक, वेळोवेळी प्रसिद्ध झालेले विशेषांक आणि मासिक अंक यांत भरपूर लिहिलं. गावागावांत असलेल्या कुमारवयीन मुलामुलींनी लेखनाला उदंड प्रतिसाद दिला. त्यामुळं तर लेखनात अधिक गुंतत गेलो. काही वाचकांनी थेट संपर्क साधला. काही जण पत्रांद्वारे, समाजमाध्यमांद्वारे माझ्यापर्यंत पोचले. 'लेखनातल्या कल्पना खूप आवडतात', 'शब्द त्यांचं सौंदर्य अधिक खुलवणारे असतात', 'सगळी वर्णनं चित्रदर्शी वाटतात', असं ही मुलं सांगत राहिली. 'तुमची भाषा अगदी साधी, सोपी आणि प्रवाही असते', असंही अनेकांचं निरीक्षण होतं. हे सगळं आत्ता आठवण्याचं कारण म्हणजे, 'छात्र प्रबोधन'मधल्या लेखांचं पुस्तक तयार करण्याच्या निमित्तानं माझंच लेखन मी पुन्हा एकत्रितपणे नजरेखालून घातलं; आणि मुलांनी व्यक्त केलेली मतं तंतोतंत लागू पडत असल्याचं प्रकर्षानं जाणवलं. मीही विचारात पडलो; खरंच, हे सगळं कुठून आणि कसं बरं गोळा केलं असेल?

ठळकपणानं दिसतं ते असं, की या साऱ्याला माझी ग्रामीण पार्श्वभूमी कारण ठरली असावी. माझं बालपण जिथं फुलत-बहरत राहिलं, त्या छोट्या गावाचा, तिथल्या निसर्गाचा, यात्रा-जत्रांचा आणि सवंगड्यांचा सहवास यांनी माझी भाषा व शैली तयार केली असावी. होतं तरी कसलं हे गाव? डोंगररांगांनी वेढलेलं. हिरव्यागार दाट झाडापानांनी झाकून टाकलेलं. ओढ्याच्या खळखळाटाचं गाणं चोवीस तास सोबतीला असलेलं. सूर्यनारायणाच्या संकेतानुसार चालणाऱ्या दैनंदिन व्यवहारांत गुंतलेलं. माकडवाल्याच्या किंवा डोंबाऱ्याच्या खेळाभोवती नजरांचे आरसे बांधून ठेवलेलं. मंदिरांतल्या कथा-कीर्तनांतून संस्कार करणारं. फुगेवाल्याच्या कुरकुरीत हाका ऐकून त्याच्या मागं धावणाऱ्या मुलांचं. हे गाव खरोखर विलक्षण होतं. आजूबाजूची ही समृद्ध आणि अजब दुनिया आम्ही मुलं तेव्हा मनसोक्त लुटून घेत होतो. मनाच्या कप्प्यांत खोलवर जपून ठेवत होतो. डोहांत डुंबण्यात, झाडांवर सरसर चढून जांभळं, आंबे, पेरू अशी अवीट गोडीची फळं पोटभर खाण्यात, ओढ्याकाठच्या वाळूत शंख-शिंपले शोधण्यात, पक्ष्यांची रंगीबेरंगी पिसं मिळवण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्यात ते दिवस कसे पुढं सरकत गेले, ते ध्यानातही आलं नाही.

निसर्गाच्या उमलत्या महोत्सवांत, पारंपरिक सणासमारंभांत, यात्राजत्रांच्या जल्लोषांत, लोकगीतांच्या आणि लोककलांच्या मुक्त आविष्कारांत माझं छोटं गाव रंगून गेलं होतं. दर दिवशी यांतलं काही ना काही घडत असे. घरोघर टपाल आणि मनिऑर्डरी पोचविणारा पोस्टमन, सकाळी दारी येणारा वासुदेव, यात्रेत

पालखीपुढं दिवटी घेऊन उभा असणारा भुत्या, लाकडाची मोळी घेऊन येणारे मोळीविके, आठवडे बाजाराची रंगत वाढविणारे कापडवाले, गारेगारवाले, खारी-बटरवाले, भेळवाले, भाजीवाले ही सगळी माणसं आम्हांला गोष्टींतली पात्रच वाटत. पुस्तकांच्या पानांतली चित्रं जिवंत होऊन आमच्या आजूबाजूला वावरत असल्याचा अनोखा अनुभव आम्ही सतत घेत असू. निसर्गानं भला मोठा कॅनव्हास जणू आमच्यासाठीच ठिकठिकाणी खुला केलेला होता. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत बदलत जाणारी दृश्यं आणि त्यांचे रंग दिवसभर आम्ही न्याहाळत असू. झोपी गेल्यावर स्वप्नांच्या राज्यातही तोच निसर्ग आणि तीच दृश्यं भेटीला येत. आम्ही झोपेत असेपर्यंत आजूबाजूनं रेंगाळत. पांघरुणातून बाहेर आलो, की स्वप्नं गायब व्हायची; आणि त्यांची जागा खराखुरा निसर्ग पुन्हा घ्यायचा. 'गवत उंच दाट दाट, वळत जाई पायवाट' हे गाण्याचे शब्द परिसरात ठिकठिकाणी गात असल्यासारखं वाटे. गवतातून नागमोडी वळणं घेत जाणाऱ्या पायवाटा आमच्यासाठी जणू हे गाणं रोजच गुणगुणत होत्या.

पाठ्यपुस्तकाच्याही आधी निसर्गाचं सुंदर पुस्तक हाती येणं, ही परमेश्वरी कृपाच म्हणायची. या पुस्तकात कितीतरी धडे होते, कविता होत्या. त्यांची रंगीबेरंगी चित्रं होती. हे धडे-कविता आम्हांला शिकवायचं कोण? - तर तोही निसर्गच! मग धड्यांच्या गोष्टी व्हायच्या; आणि कवितांची गाणी व्हायची. गोष्टी ऐकताना वाटायचं, यातलं जांभळाचं झाड म्हणजे आपल्या ओढ्यावरचंच असणार! गोष्टींतला राक्षस गावापलीकडच्या डोंगरामागं झाडींत राहत असावा. 'कालियामर्दन' घडलं, ते आपल्याच ओढ्याच्या डोहात. आमचं विश्व म्हणजे हे छोटं गावच होतं; त्यामुळं ऐकतो त्या सगळ्या गोष्टी, कहाण्या इथल्याच असणार, असा विश्वास असणारंच आमचं तेव्हाचं वय होतं. गावाबद्दलचा अभिमान आमच्या मनावर तेव्हा जो स्वार झाला, तो मात्र आजसुद्धा कायम आहे!

खरं म्हणाल, तर माझं गाव एक अनोखी प्रयोगशाळाच होती. जमिनीत बीज रुजतं कसं, ते फुलतं कसं, खोड उंच होत जाताना त्याला फांद्यांचे हात कसे फुटत जातात, ढगांची फौज आकाशात कशी जमा होते, त्यातून पाऊस कसा कोसळतो, वीज कशी चमचमून उठते, पक्षी कुठं राहतात, ते कसे गातात, ऋतू कसे बदलत जातात, हे कधी आम्हांला पाठ्यपुस्तकांतून शिकावंच लागलं नाही; कारण हे प्रयोग आम्ही नुसते पाहत नव्हतो; तर अनुभवतही होतो. अक्षरं-शब्द आम्ही शाळेत शिकलो; पण आजूबाजूच्या या निसर्गानं त्यांना अर्थ दिला, सौंदर्य दिलं आणि मग हेच शब्द, हीच चित्रं शब्द होऊन कागदांवर घरंगळत राहिली.

शाळकरी वयाची मुलं डोळ्यांत आणि अनुभवांत कायकाय टिपत असतील? त्याचा कुठला संस्कार त्यांच्या मनांवर उमटत असेल? मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला

त्यातून काही आकार येत असेल का? लहान वयात साठवून घेतलेल्या अशा प्रतिमा पुढं किती टिकून राहत असतील? सगळीच मुलं निसर्गत:च आजूबाजूचं विश्व बरोबर घेत असतील; तर मग ती पुढं व्यक्त का होत नाहीत? काहींनाच ते का जमू शकतं? शब्द, चित्र, अभिनय, संवादफेक इत्यादी माध्यमं भिन्न असली, तरी मोठं झालेल्या या मंडळींत या प्रतिमा कशा प्रकट होत असतील? कारण सांगता येत नाही; पण मी यांपैकी चित्रांचं आणि शब्दांचं माध्यम आपलंसं केलं. माझ्या बालपणातलं गाव, त्याची विविध रूपं मला पुन:प्रत्ययाचा आनंद देत राहिली.

'अंधाराचे डोळे' या ललित लेखसंग्रहात निसर्ग तर आहेच; पण त्यांत अगदी साध्या-साध्या गोष्टींत सापडलेला नवा-वेगळा आशयही आहे. चिंतनशीलता आहे. अनुभवांचं निराळेपण आहे. कधी त्यांत मोठ्या माणसांत दडून बसलेलं मूलपणही डोकावलं आहे. काही वेळा तर गावात जे अजब जग पाहिलं, त्याचं अगदी चित्रदर्शी वर्णनही शब्दांतून साकार झालं आहे. घराची आवराआवर करण्यासारख्या कृतींतूनही कधी कशी शिकवण मिळाली, असंही काही या लेखनात येऊन बसलं आहे. सौंदर्याचा शोध घेता घेता अखेर ते कशात सापडलं, त्याचाही अनुभव सहजपणानं मांडलेला आहे.

हे सगळं कुठून बरं आलं? तर 'छात्र प्रबोधन'च्या पानांतून-अंकांतून. महेंद्रभाईंनी (सेठिया) 'लिहा' असं सुचवलं; आणि मी लिहीत गेलो. सर्व प्रबोधकांनी ते वाचलं. कधीकधी ऐकलंसुद्धा. त्या सगळ्यांच्या अभिप्रायांनी लेखनासाठी उभारी मिळत गेली. कधी स्वत:होऊन लिहिलं; तर कधी 'छात्र प्रबोधन'च्या संपादकीय मंडळींनी सुचवलं, म्हणून लिहिलं. महेंद्रभाई, शैलजाताई (देशमुख), शिल्पाताई (कुलकर्णी) यांनीही लेखनासाठी वेळोवेळी विषय दिले. लेखांची मांडणी व सजावट करणाऱ्यांनीही आश्वासक अभिप्राय दिले. या सगळ्यांचाच अकृत्रिम स्नेह लाभला; त्यामुळं या कुणालाही आभाराचा उल्लेखही परकेपणाचा वाटू शकतो; पण संकेतानुसार तो टाळता कसा येईल? 'छात्र प्रबोधन'च्या पुस्तकनिर्मिती साहायक माधुरी गोडबोले यांनी 'हे आपलंच पुस्तक आहे' अशा दृष्टीनं त्याच्या निर्मितीच्या वेगवेगळ्या पैलूंकडं लक्ष पुरवलं. वाचकांच्या हाती असलेल्या या देखण्या पुस्तकामागं त्यांचे खूप प्रयत्न आहेत. पुस्तकाचं सुंदर मुखपृष्ठ आणि चित्रसजावट यामुळं पुस्तकाचं सोनं झालं आहे. माझे चित्रकार मित्र दीपक संकपाळ यांनी तातडीनं काही चित्रं व मुखपृष्ठ काढून दिलं. त्यांच्या चित्ररेषांना कमालीचा लोभसपणा, मार्दव आणि सौंदर्य लाभलेलं आहे. या पुस्तकांत ते वैशिष्ट्य पानोपानी दिसत आहे. या सर्वांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद!

– मल्हार अरणकल्ले

अनुक्रमणिका

- प्रतिसादी वाचकवीर स्पर्धा १०

१. माकडांचा खेळ ११

२. सर्जनाचं पिसं १५

३. रेषांचं शहाणपण १९

४. पहिली प्रसिद्धी ♠ २२

५. पत्त्यांचा बंगला २७

६. डोळस स्वीकारशीलता ३१

७. संक्रमण ३५

८. हा खेळ सावल्यांचा ३८

९. सौंदर्य कशात असतं? ४०

१०. सातवी खोली ♠ ४२

११. देवाचे डोळे ४५

१२. जिद्दीची साधना ४७

१३. चटकदार ५१

१४. गुंता ५४

१५. खुणेचं पान ♠ ५७

१६. गरम चहाची कथा ५९

१७. काचेवरील धूळ ६२

१८. घड्याळाची गोष्ट ६६
१९. जिद्दीचं लोभस रूप ६९
२०. उत्तरांची दिशा ७२
२१. आवराआवर ७६
२२. अंधाराचे डोळे ♣ ८०
२३. गाण्याचं कोडं ८४
२४. आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे ८६
२५. ध्यासाच्या दिशेनं ९१

लेखांचे अभिवाचन ऐका!

अनुक्रमणिकेत ♣ ♠ या खुणा असलेल्या लेखांच्या शेवटी दिलेले क्यू आर कोड स्कॅन करा. (त्यासाठी गूगल प्ले स्टोअरवरून क्यू आर कोड स्कॅनर हे ॲप डाउनलोड करा.)

♣ लेख कसा सुचला व लेखाचे अभिवाचन ऐका लेखकाच्या आवाजात!

♠ अभिवाचन स्पर्धा! त्यांतील सर्वोत्कृष्ट अभिवाचन १५ नोव्हेंबर २०२२ नंतर ऐका!

लेख अभिवाचन स्पर्धा

अनुक्रमणिकेत ज्या लेखांच्या शीर्षकासमोर ♠ असे चिन्ह दिले आहे, त्या लेखांचे वाचकांनी अभिवाचन करून त्याची ऑडिओ क्लिप ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत chhatra.abhivachan@gmail.com या इ-मेलवर पाठवावी. इ-मेलमध्ये आपले नाव, गाव, इयत्ता/वय, मोबाइल क्र., पुस्तकाचे व लेखाचे नाव नोंदवावे.

त्या-त्या लेखांच्या खाली दिलेल्या क्यू आर कोडला सर्वोत्कृष्ट अभिवाचन १५ नोव्हेंबर २०२२ नंतर जोडले जाईल. उत्तम अभिवाचन करणाऱ्या सर्वांना इ-प्रमाणपत्र पाठविले जाईल.